ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# प्रत्यक्ष विदेशी गुंतवणीकीचा FDI भारतीय शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणामांचा विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. भेदराज भानुदास ढवळे**
सहायक प्राध्यापक व विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग
स्व. निर्धनराव पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय
मुरमाडी/तुपकर ता. लाखनी जि. भंडारा (महाराष्ट्र)

★★★

**सारांश :** विकसनशील अर्थव्यवस्थेत भांडवलांची कमरता हा विकासातील महत्वाचा अडथळा आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला तर गुंतवणूकीची कमतरता हे वैशिष्टेच असलेला दिसुन येते. ही भांडवलाची कमरता दूर करण्यासाठी प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक अत्यंत महत्वाची भुमीका पार पाडताना दिसत आहे. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीमुळे भारतातील गुंतवणूक तर वाढलीच त्याचबरोबर तंत्रज्ञानाचे आदानप्रदान, रोजगारावाढ, आधारभुत संरचनेची निर्मिती, उत्पादनात वाढ व एकूणच देशातील नागरिकांच्या राहणीमानात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला विकासाचे इंजीन म्हटलेले आहे.

भारत हा कृशीप्रधान देश आहे. भारतातील जवळपास 65टक्के लोकसंख्या शेती व शेतीवर आधारीत उद्योगावर अवलंबून आहेत. देशाच्या एकुन घरगुती उत्पादनात जवळपास 19टक्के वाटा हा शेतीक्षेत्राचा आहे. म्हणूनच शेतीक्षेत्राला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे म्हटले जाते. त्यामुळेच देशातील अर्थव्यवस्थेच्या बाबतीत घेतलेला कोणताही निर्णय हा प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या शेतीक्षेत्रावर परिणाम करताना दिसून येतो. इ.स. 1991 ला भारत सरकारने देशाच्या प्रगतीसाठी खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकीकरण असा विकासचा मॉडेल प्रस्तूत केलेला आहे. याच विकासाच्या सिध्दान्ता मधुन विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला पुर्वी 51टक्के पर्यत गुंतवणूक करता येत होती. आता शेतीक्षेत्रात 100 टक्के प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहन दिलेली आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीमुळे भारतातील सेवाक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, शेतीक्षेत्र, रस्ते व वाहतुक, आरोग्यक्षेत्र, विमा क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, वाहन उद्योब क्षेत्र इत्यादीमध्ये भरीव गुंतवणूक झालेली आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीमुळे फार मोठया प्रमाणात रोजगार प्राप्त झालेला आहे. शेतीक्षेत्रामध्ये अन्न व प्रक्रिया उद्योग, रबर उद्योग, फरमैटेशन उद्योग, वनस्पती तेल उद्योग शेतीसाठी लागणारी यंत्रे, खत उद्योग, चहा व कॉफी उद्योग इत्यादी शेती व शेतीवर आधारीत उद्योगामध्ये फार मोठया प्रमाणावर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर व मुलतः शेती क्षेत्रावर काय परिणाम झाला हे पडताळून पाहणे हाच या अभ्यासाचा मुलभूत उद्देश आहे. शेतीक्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक वाढविण्यासाठी भारत सरकारने कोणकोणते प्रयत्न केले? आणि त्याचा काय परिणाम झाला? 1991 ते 2020 या एकुण कालावधीत प्रत्यक्ष विदेशी गुंतणूक किती झाली? कोणकोणत्या राज्यात झाली? कोणकोणत्या क्षेत्रात झाली? या सर्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा हेतु आहे.

**महत्वपूर्ण शब्द :–** प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक, भारत सरकारचे शेतीविषयक धोरण, प्रत्यक्ष झालेली गुंतवणूक, आर्थिक विकास.

**प्रस्तावना –** स्वातत्र्यानंतर भारतात भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेच्या चांगल्या गुंणांचा अवलोकन करून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. भांडवलशाही समाजवादी अर्थव्यवस्थचा स्विकार करण्यात आला. भांडवलशाही समाजवादी अर्थव्यवस्था असा या अर्थव्यवस्थेचा स्वरूप होता. काही उद्योग सरकारद्वारा व काही उद्योग भांडवलदारांकडून तर काही उद्योग दोन्हीकडून चालविले जात होते. शेतीक्षेत्र सुध्दा खाजगी क्षेत्रातच होते. शेती क्षेत्राचा व अर्थव्यवस्थेचा विकास व्हावा या उद्देशाने नियोजन आयोगाची स्थापना करून पंचवार्षिक योजना तयार करण्यात आल्या. प्रत्येक पंचवार्शिक योजनेची विशिष्ट उद्दिष्टे तयार करण्यात येतात. त्या माध्यमातुन प्रत्येक क्षेत्राचा विकास करण्यात येतो.

भारतात खाजगी उद्योग स्थापन्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक होती. त्यासाठी खुप मोठा भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई होत असे. उदयोगाने कोणत्या वस्तुंचे उत्पादन घ्यावे, किती प्रमाणात घ्यावे, कुठे विकावे, किमंत किती असावी या सर्वाचे नियंत्रण सरकारकडे होते. त्यामुळे एखादा उद्योग स्थापन करण्यासाठी सरकारवर अवलंबून राहावे लागे. मुलभुत आधारभुत क्षेत्रात फारच कमी गुंतवणूक झाली त्यामुळे भारताचा विकास फारच प्रभावित झाला. 1960 च्या दशकात भारताचा राजनैतिक सबंध सोव्हीयत रशिया सोबत होते. रशियाच्या मदतीने भारतात काही उद्योग स्थापन करण्यात आले. भारताचे रशियाशी संबंध चांगले असल्याने अमेरिका सारखे पश्चिम युरोपीय देशासोबत भारताचे सबंध चांगले नव्हते. 1980 मध्ये सोव्हीयत रशियाचे विघटन झाले त्यामुळे भारताचा आयात निर्यात व्यापार प्रभावित झाला.

1991 पर्यत भारतात षेती क्षेत्रात मूलभुत गुंवणूक न झाल्याने, रस्ते व वाहतुक क्षेत्राचा विकास न झाल्याने, जलसिंचनाच्या मूलभुत सोयीची कमतरता असल्याने दरहेक्टरी उत्पादन फारच कमी होते. त्यामुळे

भारत देश अविकसीतच राहिला होता. भारताचा विदेशी व्यापार प्रभावित झाल्याने आयात वाढली निर्यात कमी झाली त्यामुळे विदेशी कर्ज वाढले. व देशाचा विकास खुंटला. म्हणून भारतासमोर देशाची अर्थव्यवस्था खुली करण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता. 1991 मध्ये पंतप्रधान पि. व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला विकासाची चालना मिळावी याहेतुने खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरण हा नविन सिध्दांत विकसित केला.

**ऐतिहासिक पार्श्वभुमी** :— विदेशातील एखाद्या कंपनीने दुसऱ्या देशाच्या उत्पादनात किंवा उद्योगात केलेली प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक असे म्हणता येईल. ही प्रत्यक्ष गुंतवणूक दुसऱ्या देशातील एखादी कंपनी खरेदी करून किंवा त्या देशात पूर्वीपासूनच अस्तित्वात असलेल्या उद्योगातील पूर्वीच्याच व्यवहारांमध्ये अधिक किंवा जास्तीची वाढ करून केलेली असते. भारतात आर्थिक उदारिकरणाची सुरूवात 1991 मध्ये झाली. आणि तेव्हाच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीची सुरुवात झालेली दिसून येते. भारत हा विकसनशील देश असून येथील ग्राहक उपभोग्य वस्तु बाजार खुप मोठा आहे.

भारत हा जगातील तिसरा महत्वाचा देश आहे की ज्यामध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आकर्शित झालेली आहे. UNCTAD च्या सर्वेक्षणानुसार 2013 ते 2015 मध्ये चिन आणि संयुक्त अमेरिका यांच्यानंतर भारतामध्ये सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक झालेली आहे.

**अध्ययनाचे उद्देश**

1. भारत सरकारच्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक नितीचा विश्लेषण करणे.
2. प्रत्येक्ष विदेशी गुतवणूकीचा शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
3. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणांमाचा चिकित्सक अभ्यास करणे.

**संशोधनची कार्यपध्दती** :— सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग केलेला आाहे. संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये प्रकाशित पुस्तके, जर्नल्समध्ये प्रकाशित झालेली संशोधने, वर्तमानपत्र, विविध विभागांची ऑनलाईन वेबसाईटवर असणारी आकडेवारी यांचा संशोधकाला निष्कर्षाप्रत पोहचण्यासाठी मदत घेतलेली आहे.

**भारत सरकारची प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक निती** प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा इतिहास बघीतला तर असे लक्षात येते की 1991 च्या नविन आर्थिक धोरणानुसार सन 2000 पासून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला सुरुवात झाली. भारतात 2000—2001 ते 2020—2021 या एकुण 20 वर्षाचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की या कालावधीत 2000—2001 मध्ये एकूण 10,733 करोड रूपये तर 2001— 2002 या कालावधी 18,694 करोड रूपये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झाली. तर 2019—2020 ला 3,53,558/— करोड रूपये तर 2020—2021 या कालावधीत 4,42,869 करोड रूपये म्हणजेच 20 वर्शाच्या कालावधीत गुंतवणूक फार मोठया प्रमाणात वाढली. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा क्षेत्रावार विचार केला तर गुंतवणूकीत सेवाक्षेत्राला सर्वाधिक पंसती मिळालेली आहे. त्याचबरोबर वाहतुक व दळणवळन, आरोग्य, विमा, रस्ते विकास, खनिकर्म, पोलाद उद्योग, वनोत्पादन, शिक्षण, शेती अशा विविध क्षेत्रात गुंतवणूक झालेली दिसुन येते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा राज्यवार क्रमवारी पाहिली तर 2021ला गुजरात राज्यात 1,81,794 करोड रूपये गुंतवणूक होऊन देशात प्रथम क्रमांक पटकावला, तर त्याच वर्षी महाराष्ट्र राज्यात 1,71,807 करोड रूपये गुंतवणूकी सह दुसऱ्या क्रमांकावर, तर कर्नाटक तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर उत्तरप्रदेश मध्ये सर्वात कमी गुंतवणूक 4,861 करोड रूपये गुंतवणूकीसह सर्वात शेवटी असलेला दिसून येते. 2019 मध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा विचार केला तर महाराष्ट्र 52,073 करोड रूपये गुंतवणूकीसह प्रथम क्रमांक, गुजरात 18,964 करोड रूपये गुंतवणूकीसह द्वितिय क्रमांक तर कर्नाटक 30,740करोड रूपये गुंतवणूकीसह तृतिय क्रमांकावर असलेला दिसून येते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतणूक करणारे देश या बाबत विचार केला तर भारतामध्ये मार्च 2021 ला सर्वात जास्त गुंतवणुक करणारा देश मॉरिशस हा आहे. एकुण गुंतवणूकीच्या 28 टक्के गुंतवणूक मॉरिशस या देशाने केली. तर सिंगापुर ने एकुण 22 टक्के गुंतवणुक केली तर यु. एस. ए. ने एकुण 8 टक्के गुंतवणूक केली तर नेदरलॅन्ड या देशाने एकुण 7 टक्के गुंतवणूक केलेली आहे.

20 वर्षात झालेली प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीतील वाढ पाहीली तर असे लक्षात येत की, भारतातील मोठी बाजारपेठ मोठा विमाक्षेत्र, आरोग्य क्षेत्र, खनन उद्योग, शेतीउद्योग, सेवाक्षेत्र इत्यादी क्षेत्रामध्ये वाढ झालेली लक्षात येते.

**भारत सरकारची शेती क्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक निती.**

भारत सरकारच्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीच्या नविन धोरणानुसार शेती व शेतीशीसंबधित क्षेत्रात 100टक्के गुंतवणूकीस स्वयंचलित मार्गाने करता येईल. त्यातील महत्वाचे क्षेत्र खालील प्रमाणे.

1 फ्लोरीकल्चर, हार्टीकल्चर, कल्टीवेशन ऑफ व्हेजिटेवल आणि मशरूम नियंत्रित उत्पादनातील गुंतवणूक.

2 बि—बियाने आणि वनस्पती लागवडीसाठी साहित्याचे विकसन आणि उत्पादन.

3 पशुपालन (कुत्र्यांचे प्रजोत्पादन )मासेमारी जलचर, मत्सपालन.

4 शेती व शेतीसबंधीत सेवा क्षेत्र.

त्याचबरोबर चहा क्षेत्र, चहामळे, कॉफीच्या मळयाचे लागवड, रबर लागवड, वेलदोडा लागवड, पॉम आईल वनस्पती लागवड, ओलिव्ह तेल झाडांची लागवड या सर्व क्षेत्रात 100 टक्के प्रत्यक्ष गुंतवणूक स्वयंचलित पध्दतीने करण्याची परवानगी दिलेली आहे. मल्टी–ब्रॅन्ड रिटेल सेक्टरमध्ये 51टक्के गुंतवणूकीची परवागनी काही अटी व षर्तीच्या अधिनस्त प्राप्त झालेली आहे. खालील तक्त्यावरुन 2012 ते 2020 –2021 मध्ये झालेली शेतीक्षेत्रातील वर्शानिहाय गुंतवणूकीचे विश्लेषण करता येईल.

**तक्ता क.1 :– भारतातील शेतीक्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुक**

| वर्षे | एकुण गुंतवणूक करोड मध्ये |
|---|---|
| 2012 – 2013 | 1392 |
| 2013 – 2014 | 845 |
| 2014 – 2015 | 796 |
| 2015 – 2016 | 673 |
| 2016 – 2017 | 618 |
| 2017 – 2018 | 8.21.3 |
| 2018 – 2019 | 664.7 |
| 2019 – 2020 | 1040.64 |
| 2020 – 2021 | 1502.72 |

Source :- Government of India ministry of Commerc and Industry Department for promotion of Industry and Internal Trade (FDI Divison)

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की सन 2020–2021 या आर्थिक वर्षात शेती व शेतीषी सबंधीत असलेले इतर तत्सम उद्योगांमध्ये 1,34,094.21 करोड रुपयांची प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झालेली दिसुन येत आहे. परंतु या वर्षात भारतात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक एकुण 4,42,569 करोड एवढी झालेली आहे. त्यामाने भारतातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूनक शेतीवर अवलंबुन असलेल्या लोकसंख्या मागे अगदी अल्प असल्याचे दिसुन येते.

**प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणि नविन शेतीविषयक कायदे**– भारतसरकारने सप्टेंबर 2020 मध्ये भारतातील शेतीक्षेत्रावरील विकासाच्या उद्देशाने शेतीला लाभ होतील असे कायदे संसदेच्या चर्चेविना संमत केलेत.

1. आवश्यक वस्तु साठेबाजी कायदा–2020
2. शेतकरी हक्क व सुरक्षा हमी व कृषी सेवा करार विधेयक–2020
3. शेतकरी उत्पादने (व्यापार व वाणिज्य प्रोत्साहन व सुविधा) विधेयक–2020

वरील कायदे शेतकरी हिताचे आहेत असे सरकार म्हणत आहे. परंतु या कायद्याला षेतकऱ्यांचा व अर्थतज्ञांचा मोठया प्रमाणात विरोध होत आहे. हे कायदे रद्द होण्यासाठी शेतकरी गेल्या 6 महिन्यांपासुन आंदोलन करीत आहेत. त्या आंदोलनात आतापर्यंत 400 च्या वर शेतकऱ्यांनी आपला जिव गमावला. विरोध करण्याचे प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे दिसुन येत आहेत.

1. आवश्यक वस्तु साठेबाजी विधेयकानुसार कोणालाही शेतमालाची साठवणूक करण्यात कोणतेही बंधन असणार नाही. याचा परिणाम असे होईल की व्यापारी हंगामात शेतकऱ्यांचा माल कमी किमंतीत घेऊन त्याची साठेबाजी करेल. कृत्रिम टंचाई निर्माण करेल व बिगर हंगामात खुप जास्त चढया किमंतीत विकेल यामध्ये फायदा फक्त व्यापाराचा होईल.

2. शेतकरी हक्क व सुरक्षा किमंत हमी व कृषी सेवा करार विधेयका नुसार – व्यापारी शेतकऱ्यांशी एकत्रित करार शेतमाल लागवडीपूर्वीच करेल व त्या करारात विशिष्ट किमंत ठरवेल. त्या किमंतीनुसार शेतकऱ्यांना करारानुसार आपला शेतमाल विकावा लागेल. जर त्या वेळेस हमी भावापेक्षा जास्त किमंत असेल तर व्यापारी माल विकत घेणे टाळू शकतो. यामध्ये हमीभावापेक्षा कमी किमंतीला शेतकऱ्यांचा माल घेता येणार नाही याची कोणतीही हमी सरकार घेत नाही. म्हणजेच हमी भाव आपोआपच नष्ट होईल. यास शेतकऱ्यांचा विरोध आहे. एपीएमसी आपोआपच बंद होईल.

3. शेतकरी उत्पादने (व्यापार व वाणिज्य प्रोत्साहन व सुविधा) विधेयकानुसार शेतकऱ्यांना आपला माल कुठेही आणि कितीही भावाने विकता येईल व कोणत्याही पॅनकार्डधारकाला माल खरेदी करता येईल. यामुळे काय होईल तर सुरवातीला मल्टीब्रॅड क्षेत्रातील व्यापारी अदानी–अंबानी एपीएमसीच्या बाहेर सुरुवातील चढया भावाने माल विकत घेतील. काही वर्षानंतर एपीएमसी बंद होईल व त्यामुळे मल्टीब्रॅड उद्योजक कोणत्याही भावाने माल खरेदी करू शकतील.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक अशा क्षेत्रात केली तर आपले शेतकरी देशोधडीला लागू शकतील. आपण उत्पन्न केलेले आपल्यालाच विकत घेता येणार नाही. या विधेयकानुसार या शेतीक्षेत्रात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला वाव आहे. भारत देश अन्नधान्याच्या बाबतील स्वयंपुर्ण राहणार नाही याचेच ज्वलंत उदाहरण म्हणजे यावर्शी सोयाबीनच्या हंगामात सोयाबीन 4,000रूपये प्रति क्विटल विकत घेण्यात आला आणि आजच्या घडीला 10000 ते 11000रुपये क्विंटलने विकल्या जात आहे. आज सोयाबीन तेलाचे भाव 160 रूपये प्रति किलो आहे.

**टिकात्मक विश्लेषणः**– 1991 च्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या धोरणानुसार शेतीक्षेत्र खुले करण्यात आले व विदेशी गुंतवणूक होऊ लागली 2000–2021 या 21 वर्षाच्या कालावधी

ीत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक 10,733 करोड रूपयावरून 4,42,569 करोड एवढी वाढली. परंतु शेती क्षेत्रात झालेली वाढ अगदी नगण्य आहे. एकुण 21 ते 30 वर्षाच्या कालावधीत 2,96,438 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यावरूनच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे अपयश आपल्याला दिसून येते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा एकुण 20 वर्षाचा कालावधी पाहीला तर शेतीक्षेत्रात आधारभूत संरचना, रस्ते वाहतुक, गोदामाची व्यवस्था, नविन शेतीउपयोगी मशनरीज, शेतीसाठी लागणारी ऊर्जा, जलसिंचनाचे प्रकल्प, इत्यादी क्षेत्राात फारच कमी गुंतवणूक झालेली आहे. त्यामुळे आजही भारतीय शेती मान्सूनच्याच पाऊसावर अवलंबून असलेली दिसते. शेतकऱ्यांना 15–16 तास लोडशेडींग असते. पिकलेला माल गोदामे नसल्याने साठवून ठेवता येत नाही. नाशिवंत वस्तूंची वाहतुक त्वरीत होत नाही. डिझेल पेट्रोलचे भाव वाढल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढला. यावरून असे लक्षात येते की प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा फारसा फायदा भारतीय शेतकऱ्यांना झालेला नाही. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीसाठी आकर्शित करणारे वातावरण आजही भारतीय शेती व्यवस्थेत वातावरण आजही भारतीय अर्थव्यवस्थेत व पर्यायाने शेती व्यवस्थेत दिसून येत नाही.

**तक्ता क. 2 :– शेतीक्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (शेती व शेती संबधित इतर उद्योग)**

| अ.क. | शेतीक्षेत्र | मुल्य (करोड) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | अन्न प्रक्रिया उद्योग | 64745.57 | 1.96 |
| 2. | रबर वस्तु | 19994.02 | 0.62 |
| 3. | शेती क्षेत्र | 12368.89 | 0.43 |
| 4. | फरमेनटेशन | 17823.17 | 0.58 |
| 5. | वनस्पती तेल | 6142.63 | 0.19 |
| 6. | शेतीसाठी लागणाऱ्या मशिनरी | 4294.53 | 0.14 |
| 7. | खत उद्योग | 4045.15 | 0.13 |
| 8. | साखर उद्योग | 1465.02 | 0.05 |
| 9. | चामडा उद्योग | 1228.96 | 0.04 |
| 10. | टिंबर प्रोडक्ट | 1159.06 | 0.04 |
| 11. | चहा आणि कॉफी उद्योग | 854.21 | 00.3 |
| | **एकूण** | **13409** | **4.21** |

**निष्कर्श** :– भारतातील नविन आर्थिक धोरणानुसार भारतीय ग्राहक उपयोगी बाजारपेठ खुप मोठी असल्याने प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीच्या संधी विदेशी गुंतवणूकदारांना खुणावत आहेत. 2000 ते 2021 या कालावधीत लक्षात येते की गुंतवणूकीचा प्रवाह कित्येक टक्क्याने वाढलेला आहे. शेतीक्षेत्रातही नविन नविन उद्योग या मार्फत येत आहेत. भारताचा विदेशी व्यापार ही प्रभावीत होत आहे. नविन कृशी कायदेही तयार झालेली आहेत. परंतू त्यात चर्चा घडवून काही सुधारणा केल्या तर त्याचा फायदा विदेशी गुंतवणूक भारतीय शेतीची व शेतकऱ्यांचे जिवनमान उंचाऊ शकेल. आधारभुत संरचना निर्माण होऊ शकतील अशा प्रकारे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणि भारतीय शेती याचा विश्लेषण करता येईल.

***संदर्भ:***

1. *दत्त एवं सुंदरम–'भारतीय अर्थव्यवस्था' एस. चंद्र प्रकाशन दिल्ली.*
2. *मोहरे, डॉ रामदास य– 'भारतीय अर्थव्यवस्था' साई ज्योती प्रकाशन नागपुर*
3. *प्रतियोगिता दर्पण भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक*
4. *आर. बी. आय. रिपोर्ट*
5. *वर्तमानपत्र लेख*
6. *झामरे, डॉ. जी. एन.– 'इंडियन इकोनॉमी' पिपळापुरे प्रकाशन नागपुर.*
7. *झामरे, डॉ. जी. एन– 'भारतीय आर्थिक विकास आणि पर्यावरण अर्थशास्त्र' पिंपकापुरे प्रकाशन नागपुर*
8. *Government of India Ministry of commerce and Industry Department for promotion of Industry and Internal Trade (FDI Division) Website*
9. *Kanika Varma – FDI Opprtuties in India Agriculture.*
10. *Sonawane S.T. – Analysis of FDI (Foreign Direct Investment on Maharashtra Agriculture Sector – International Journal of Innovative Research in science Engineering and Techonology – 2017*